# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०६/२०१८

**१) तरुणीचा विनयभंग करुन मर्डर करण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०६/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचे घराचे जिन्याचे मागे लपुन फिर्यादी ही जेवनाचे ताट धुण्याकरीता बोहर आली असता तिचा हात पकडून तुझ्यावर प्रेम करतो कोणाला सांगु नको तेव्हा फिर्यादीने ओरडण्याचा व कोणाला आवाज देण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने फिर्यादीचा गळा हाताने दाबुन ईतरांना सांगशील तर तुझा व तुझ्या घरच्या लोकांचा चाकुने मर्डर करण्याची धमकी देवुन विनयभंग केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४(ड)४५२,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत . आरोपी अटक आहे.

**२) भुमीहीन व्यक्ती कडून कर्जाचे पैसे वसुलीचे पैसे बॅकेत जमा न करता स्वत:चे फायदया करीता वापरुन अपहार केल्याने गुन्हा नोंद :–**

सन २०१४ ते २०१५ पर्यत यातील आरोपी हा पानलोट समिती अडयाळ चा सचिव असुन याचे माध्यमातु जिल्हा कृषी अधिकारी यांची प्रकल्पानुसार उपजिवीका कार्यक्रमा अंतर्गत गावचे नियोजना नुसार पानलोट समिती अडयाळ यांना बचतगट व भुमीहीन व्यक्तीला १८ महीण्या करीता बिना व्याज मुदती करीता कर्ज देणे करीता पानलोट समिती अडयाळ यांचे खाते क्र. युनीयन बॅक भंडारा येथे ७,६१,०००/–रु. जमा करण्यात आले असुन सदर पैश्याचे कर्ज म्हणुन २९ बचतगट व ७ भुमीहीन व्यक्तीना पानलोट समिती सचिव यांचे मार्फत वाटप करण्यात आले असुन आरोपीने बनावट पावती बुक तयार करुन त्या पावती व्दारे बचतगट व भुमीहीन व्यक्ती कडून कर्जाचे पैश्याची वसुली करुन कर्ज वसुलीचे पैसे युनीयन बॅक खात्यामध्ये जमा न करता स्वत:चे फायदया करीता वापरुन किंमती ६,५९,०००/–रु. चा अपहार केल्याने फिर्यादी आदेशकुमार देवीदास गजबे वय ५७ वर्ष, रा. पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४०८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) किराणा दुकानातील सामानाची चोरी :–**

दिनांक ०७/०६/२०१८ चे २२.४५ वाजता ते ०८/०६/२०१८ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मुलचंद मेठाराम गलानी वय ६३ वर्ष, रा. अन्सारी वार्ड डॉ. गवळी दवाखाण्याच्या मागे महालक्ष्मी बिल्डींग भंडारा यांचे शहीद वार्ड भंडारा येथील दिनांक ०७+०८/०६/२०१८ चे रात्र दरम्यान कोणीतरी आत चोराने दुकानाचा प्लाऊडच्या दरवाज्याची टिचकणी खोलुन आत प्रवेश करुन दुकानातुन अनेक प्रकारचे सिगरेट पॉकेट, किराणा सामान, १,२,५,१०/–रु. चे सिक्के ३००/–रु चे असा एकुण ४०,३००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिरडकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) १० चक्का ट्रकची चोरी :–**

दिनांक ०७+०८/०६/२०१८ चे १८.०० ते ०७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रंजीत दाजीबा भोंगाडे वय ५० वर्ष, रा.० आंबाळी याचा शारदा पेट्रोल पंप अडयाळचे आवारात ऊभा करुन ठेवलेला १ टाटा कंपनीचा ट्रक क्र. एमएच ३१ सी क्यु १७९२ १० चक्का किंमती ५,५०,०००/–रु. चा कोणीतरी अज्ञात चोराने डायरेक्ट करुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन लोखंडी सब्बलने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०८/०५/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी लक्ष्मण धोंडु क्षिरसागर व आरोपी हे सख्खे चुलत भाऊ असुन यातील आरोपी हा त्याचे घराचे वरनीचे बांधकाम करीत असता फिर्यादीचे जागेत वरण आल्याने फिर्यादीने आरोपीस काढण्यास सांगीतले असता आरोपीने वरण न काढता भांडण करुन लोखंडी सब्बलने फिर्यादीचे डावे हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०८/०६/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीने लावलेल्या वांग्याचे झाड उपडून फेकले असता फिर्यादी व तीचे पतीने आरोपीस हटकले तेव्हा आरोपीने फिर्यादीस व तीचे पतीला वाईट – वाईट शिवीगाळ करुन पतीला काठीने मारायला धावला असता फिर्यादीने तीचे पतीला बाजुला केले असता ती काठी फिर्यादीचे उजवे हाताला लागल्याने फिर्यादीस जखमा होवुन रक्त निघाले असे फिर्यादी सौ.सरीता श्रावण खरकाटे वय ३५ वर्ष, रा. गौराडा हिचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**७) ट्रकची ट्रकला धडक लागुन स्वतः सामानाचे नुकसान करुन जखमी होवुन बाजुच्या व्यक्तीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/०६/२०१८ चे १४.१२ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन हयाच ट्रक समोरुन जाणारा अज्ञात ट्रक पाठीमागेहुन धडक देवुन आरोपीने स्वतःचे ट्रक चे सामानाचे नुकसान करुन स्वतः जखमी झाले व शेजारी बसणाऱ्या व्यक्तीस सुध्दा जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. घरडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३७७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) बसला दगड मारुन बसचे समोरील काच फोडल्याने नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक ०८/०६/२०१८ चे १९.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा महाराष्ट्र परिवहन विभागाची बस क्र. एमएच ४० एक्यु ६०८० निळया रंगाची बस ही भंडारा वरुन साकोली कडे जात असता कोणीतरी अज्ञात आरोपी ईसमाने बसवर दगड मारुन बसचे समोरील काच फोडल्याने अंदाजे २०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी जागेश्वर श्रीकृष्ण लांजेवार वय ४२ वर्ष, रा. पंचशिल वार्ड साकोली यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३,४ सार्वजनिक विद्रुपी करण कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०८/०६/२०१८ चे १९.५५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा महाराष्ट्र परिवहन विभागाची बस क्र. एमएच ०७ सी ९३५५ निळया रंगाची बस ही भंडारा वरुन पालांदुर येथे प्रवासी घेवुन जात असतांना कोणीतरी अज्ञात आरोपी ईसमाने बसवर दगड मारुन बसचे समोरील काच फोडल्याने अंदाजे २०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी धनीवंत गोंविदा चामलाटे वय ५४ वर्ष, रा. पलाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३,४ सार्वजनिक विद्रुपी करण कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) अवैध हातभट्टी दारु / जुगार अड्ड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०८/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, गोबरवाही व तुमसर येथे हातभट्टी दारु/ जुगार अड्डयावर धाडी घालुन ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१ लिटर हातभट्टी+ ३०० किलो सडवा मोहा किंमती १८,७००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १००१/–रु. असा एकुण १९,७०१/–रु. माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०८/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०२, तीन सिटर वाहनाकरीता– ०६ ईतर वाहनांवरती – ९४ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनी. माया चाटसे)**
**महिला सेल भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.